# बृहन्मुंबई महानगरपालिका

(सहाय्यक अभियंता (परि.) एच/पूर्व विभाग)

## स्वारस्य अभिव्यक्ती

एच/पूर्व विभागातील प्रभाग क्र ९५ मधील बी.जी.खेर मनपा प्रसूतिगृह येथे पावसाळी शेडची व्यवस्था करणेबाबत या कामाकरीता म.न.पा. अधिकृत कंत्राटदार यांच्याकडून अर्ज मागवित आहे.

म.न.पा. अधिकृत कंत्राटदार यांनी या बाबतचा तपशील, अर्ज एच/पुर्व विभाग कार्यालयातील मुख्य लिपिक (व्यय) 'एच/पुर्व' विभाग यांच्याकडे संपर्क साधावा. सदर अर्जाचा नमुना हा दि. 21.08.2026 रोजी स.11:00 ते दुपारी 04:00 वाजेपर्यंत रक्कम रु. 463/- (GST सह) भरून मुख्य लिपिक (व्यय) 'एच/पुर्व' विभाग यांच्या कार्यालयात उपलब्ध होईल.

म.न.पा. अधिकृत कंत्राटदारांचे अर्ज जमा करण्याची मुदत ही दि. 21.08.2026 रोजीपासून स.11:00 ते 21.08.2026 रोजी दुपारी 05:00 वाजेपर्यंत आहे. अर्ज जमा करताना सोबत म.न.पा. अधिकृत कंत्राटदाराची मुळ कागदपत्रे सादर करणे गरजेचे आहे. अर्धवट तसेच चुकीचे भरलेले अर्ज स्विकारले जाणार नाहीत. याची कृपया नोंद घ्यावी. तसेच अर्ज सादर करण्याच्या अंतिम वेळेनंतर म्हणजेच दि. 20.08.2026 रोजी दुपारी 05:00 वा. नंतर अर्ज स्विकारले जाणार नाहीत.

तसेच सदरची सोडत ही दिनांक 21.08.2026 रोजी दुपारी 05:00 वा. नंतर सहाय्यक अभियंता (परि.) एच/पूर्व विभाग यांच्या दालनात घेण्यात येईल. तसेच सदर कामाकरीता एक स्वतंत्र म.न.पा. अधिकृत कंत्राटदार घेण्यात येतील.

सदर सोडती करिता सर्व पात्र मनपा कंत्राटदार उपस्थित राहणे अनिवार्य आहे. केवळ संबंधित म.न.पा. अधिकृत कंत्राटदार / एक प्रतीनिधी यांना सहाय्यक अभियंता (परि.) एच/पूर्व विभाग यांच्या दालनात प्रवेश देण्यात येईल. एक पेक्षा जास्त प्रतीनिधी यांना सहाय्यक अभियंता (परि.) एच/पूर्व विभाग यांच्या दालनात प्रवेश देण्यात येणार नाही. याची कृपया नोंद घ्यावी.

**स्वारस्य अभिव्यक्ती** स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार मा. सहाय्यक आयुक्त ' एच/पूर्व' विभाग यांनी राखुन ठेवलेला आहे. अट असलेली **स्वारस्य अभिव्यक्ती** स्विकारली जाणार नाही.

सही/-

20.08.2026

**सहाय्यक अभियंता (परि.) एच/पूर्व विभाग**